**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २४/२०२६ मधील निशाणी १ वरील आदेश**

**CNR NO. MHSN070003662026**

**अमिन हाजीसाब जातकर वि महाराष्ट्र सरकार**

०१. सदरचा अर्ज अर्जदार अमिन हजिसाब जातकर यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता ५०३ अन्वये कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी गुन्हा नोंद क्रमांक १३२/२०२६ मध्ये जप्त केलेला चारचाकी आयशर टेंम्पो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० डीटी ७०८५ सुपुर्तनाम्यावर परत मिळण्याकरता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार यांनी शपथपत्र दाखल केले आहे.

२. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरचे वाहन कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी गुन्हा नोंद क्रमांक १३२/२०२६ मध्ये जप्त केले आहे. सदरचे वाहनाचा वापर अर्जदार हे स्वतःच्या व्यवसायासाठी करीत आहेत. प्रस्तुतचे वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास विनावापरामुळे त्याचे तत्सम पार्ट खराब होवुन अर्जदारचे अतोनात नुकसान होणार आहे. अर्जदार हे न्यायालय सांगेल त्या अटींची पुर्तता करण्यास तयार आहेत. म्हणुन सदर वाहनाचा ताबा सुपुर्तनाम्यावर त्यास मिळावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर सरकारी अभियोक्ता व कवठेमहांकाळ पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रस्तुत अर्जास कवठेमहांकाळ पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ५ अन्वये सादर केले आहे. त्यांनी म्हणण्यात नमूद केले आहे की सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. सदर गुन्हयातील आयशर टेंम्पो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० डीटी ७०८५ चा यापूर्वी आरोपी यांनी अवैध जनावर वाहुकीकरीता वापर केला असून त्याबाबत त्यांच्याविरुध्द विटा पोलीस ठाणे व तासगांव पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत.

गुन्हयातील वाहन मूळ मालकास परत केल्यास ते वाहन पुन्हा तशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जास सहा. सरकारी अभीयोक्ता यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ६ अन्वये सादर केले आहे. सदरचे वाहन पुराव्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. अर्जदार सदर वाहनाचा पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयामध्ये वापर करण्याची दाट शक्यता आहे. तसेच वाहनाची विक्री करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे. प्रस्तुत अर्जास त्रयस्थ इसम श्रीमती मनेका गांधीज पिपल फॉर ॲनिमल या संस्थेने आपले म्हणणे नि.क्र.८ दाखल केले आहे. त्यांनी आपल्या म्हणण्यात कथन केले आहे की, गुन्हयातील जप्त जनावरे त्यांच्या संस्थेत संगोपनासाठी दाखल केलेली आहेत. सदर जनावरांना सांभाळण्यासाठी दैनंदिन खर्च येत आहे. त्यामुळे जनावरे दाखल केल्यापासून प्रत्येक जनावरांसाठी रक्कम रुपये २००/- टेंम्पो चालकाने संस्थेस देण्याची मागणी त्यांनी केली आहे. सदर रक्कम न दिल्यास प्रस्तुत वाहन सदर रकमेच्या सुरक्षीततेसाठी ठेवून घेणेत यावे.

४. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांनी आपल्या युक्तीवादामध्ये असे कथन केले आहे की, अभीयोग पक्षातर्फे प्रस्तुत अर्जात नमूद वाहन हे विटा पोलीसस्टेशन येथील गु.र.न. ९/२०२६ व तासगांव पोलीसस्टेशन येथील गु र नं.४५०/२०२५ मध्ये देखील समाविष्ट असल्याचे नमूद केले असून सदर गुन्हयांच्या एफ आय आरची प्रत अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहे. परंतू त्याबाबतचा गुन्हा सिध्द झाला नाही. त्यामुळे केवळ गुन्हयामध्ये सदर वाहन दिसत आहे म्हणून त्याचा ताबा नाकारणे योग्य होणार नाही. अर्जदार यांचा वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांना जसे भाडे मिळेल तसे त्यांचे वाहन वाहतुकीसाठी देणे भाग पडते. सदर वाहन पुन्हा गुन्हयामध्ये वापरनार नाही किंवा कायदयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करून पशुंच्या वाहतुकीसाठी वापरण्याच्या अटीवर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदार यांना देण्याची विनंती त्यांनी

केली आहे.

०५. अभीयोग पक्षातर्फे विधीज्ञ यांनी आपल्या युक्तीधामध्ये असे कथन के आहे की अभीलेखावरील कागदपत्रानुसार प्रस्तुत वाहन हे नियमीतपणे गुन्हयात वापरले जात असल्याचे दिसून येत आहे. जतर वाहनाचा अंतरीम ताबा अर्जदारास परत केल्यास सदर वाहन पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा करण्यासाठी वापरण्याची दाट शक्यता आहे. यास्तव अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्हीही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनाला पुष्टी देण्यासाठी अभीलेखावर जप्त वाहन चारचाकी आयशर टेंम्पो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० डीटी ७०८५ चे नोंदणीप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर नोंदणीप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हे जप्त वाहनाचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही सदरच्या वाहनाचा ताबा मागितलेला नाही.

०७. सरकारी अभीयोक्ता व तपासी अधिकारी यांनी वाहन अर्जदारास परत केल्यास अर्जदार सदर वाहनाचा पुन्हा तशाच प्रकारचा गुन्हा करण्यासाठी वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर गुन्हयातील वाहन विटा पोलीस स्टेशन येथील गु.र.नं.९/२०२६ व तासगांव पोलीस स्टेशन येथील गु.र.नं.४५०/२५ मध्ये देखील प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम मधील कलम ११ अन्वये घडलेल्या गुन्हयामध्ये जप्त केले असल्याचे कथन तपासी अधीकारी यांनी आपल्या म्हण्यामध्ये केले आहे. त्रयस्थ इसम यांनी नि.क्र. ११ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये सदर दोन्ही गुन्हयांच्या एफ आय आरची प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच सदर वाहनाची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही असा आक्षेप घेतला आहे. सदर बाबी विचारात घेवून अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत गुन्हयात

वापरलेले वाहन हे यापूर्वी दोन गुन्हयामध्ये वापरले असल्याचे प्रथम खबर अहवालावरुन दिसत असलेतरी त्याबाबतचा गुन्हा सिध्द झालेला नाही. फौजदारी न्यायतत्वानुसार जोपर्यंत गुन्हा सिध्द होत नाही, तोपर्यंत आरोपीला निर्दोष समजण्यात येते. पस्तुत गुनहयामधे अर्जदार हा आरोपीदेखील नाही. असे असताना आरोपीचे वाहन त्याला परत करणे नाकारणे न्यायोचित ठरणार नाही.

०८. त्रयस्थ इसम यांचा आक्षेप विचारात घेता, सदर वाहनामधील जप्त जनावरे ही गोशाळेमध्ये ठेवणेत आलेली आहेत. मा. मुंबई उच्च् न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सदर जनावरांचा चारा व इतर खर्चासाठी वाहनमालकांवर देखील खर्च लादता येतो. सदर खर्चाबाबत महाराष्ट्र शासनामार्फत अति.आयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समीतीने पशुंच्या पालणपोषण व वाहतुकीसाठी प्रतिदिन खर्च गायवर्गीय मोठया प्राण्यांसाठी दररोज दोनशे रुपये व लहान प्राण्यासांठी दररोज दीडशे रुपये असा निश्चीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत गुन्हयामध्ये दहा मोठे पशु व लहान तीन पशु जप्त करण्यात आले आहेत. सदर पशु दि.१०/०४/२०२६ रोजी जप्त करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर पशुंच्या पालनपोषणाचा खर्च दहा मोठे पशु म्हणजे प्रतिदिन दोन हजार रुपये व तीन छोटे पशु यांचा प्रत्येकी रुपये दीडशे प्रमाणे प्रतिदिन चारशे पन्नास रुपये असा एकूण दोन हजार चारशे पन्नास प्रतिदिन नुसार आजअखेर त्रेपन्न दिवसांचे रक्कम रुपये एक लाख एकोणतीस हजार आठशे पन्नास असा येत आहे. सदर गुन्हयातील पशुंच्या मालकानेदेखील पशु परत मिळण्यासाठी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२८/२०२६ दाखल केलेला आहे. सदर पशुंच्या पालणपोषणांचा खर्च देण्याची जबाबदारी ही पशुंच्या मालकांचीदेखील आहे. त्यामुळे सदर पशुंच्या पालणपोषणासाठी वाहनमालक व पशुमालक यांच्यावर अर्धी अर्धी जबाबदारी देणे न्यायोचित ठरणार आहे.

०९. वरील सर्व बाबी विचारात घेता अर्जदार यांना जप्त वाहनाचा अंतरिम

ताबा देतांना अर्जदार यांच्यावर अटी व शर्ती लादणे न्याय्य होणार आहे. प्रस्तुत गुन्हयामध्ये आजअखेर दोषारोपपत्र दाखल झालेले नाही. त्यामुळे दोषारोपपत्र दाखल होवून पुराव्याकामी सदर वाहनाची आवश्यकता भासण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदर वाहन कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात पडुन राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता आहे. तसेच प्रस्तुत अर्जदार हे गु.र.क्र.१३२/२०२६ मधील आरोपी नाहीत. त्यामुळे अर्जदार यांच्यावर योग्य त्या अटी व शर्ती ठेवून सदर वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य ठरते. यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे-

## आदेश.

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. पोलीस निरीक्षक, कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी चारचाकी आयशर टेंम्पो वाहन ज्याचा नोंदणी क्रमांक एमएच १० डीटी ७०८५ चा अंतरिम ताबा अर्जदार अमिन हजिसाब जातकर, राहणार मिरज, ता. मिरज, जि.सांगली यांना रक्कम रुपये ७,००,०००/- ( सात लाख रुपये) चा सुपुर्तनामा (Indemnity Bond) लिहुन दिल्यावर व त्याची योग्य ओळख पटवुन दिल्यानंतर, व त्र्यस्थ इसम यांना पशुंच्या पालणपोषणाची अर्धी रक्कम म्हणणे रक्कम रुपये ६४९२५/- दिल्यानंतर खालील अटींवर देण्यात यावा-

**अ.** अर्जदारने सदर गुन्ह्याचा अंतिम निकाल होईपावेतो सदरचा मुद्देमाल कोणत्याही मार्गे हस्तांतर करु नये अगर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

**ब.** अर्जदाराने न्यायालय हुकुम करेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

**क.** अर्जदार यांनी सदर मुददेमालाचा वापर कोणत्याही प्रकारचा गुन्हा करण्यासाठी किंवा पशुंची वाहतूक करताना कोणत्याही कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करु नये अन्यथा सदर सुपुर्तनाम्यातील अटींचा भंग केल्यामुळे वाहनाचा ताबा रदद करण्यात येईल.

**ड.** पोलीस निरीक्षक कवठेमहांकाळ पोलीस ठाणे यांनी अर्जदारच्या खर्चावर सदर वाहनाचे छायाचित्र काढुन त्याचा पंचनामा करावा. सदर छायाचित्र, पंचनामा व बंधपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

KADAM NUTAN SACHIN

Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.06.02 14:31:19 +0530

दिनांक ०२.०६.२०२६
कवठेमहांकाळ.

( श्रीमती एन. एस. कदम )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
कवठेमहांकाळ.